दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २४९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.२० एप्रिल २०२५

“सुरवात करायची असेल तर
आजपासूनच करा,
उद्यापासून करू असं म्हंटल तर
तो उद्या कधीच येत नाही”.




## महिलेला सरपंचासह १० जणांकडून बेदम मारहाण !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, बीड :** अमानुष मारहाणीच्या घटनेमुळे बीडमधील गुन्हेगारी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील सेनगाव येथील ज्ञानेश्वरी अंजान या महिला वकिलाला सरपंच व इतर दहा जणांनी बेदम मारहाण केली आहे. १४ एप्रिल रोजी लाकडी काठी व रबरी पाईपने महिलेला मारहाण करण्यात आली. या प्रकरणात वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी फरार आहेत.

घराजवळ होत असलेल्या ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारीनंतर महिलेला बेदम मारहाण झाल्याची माहिती आहे. महिलेला अमानुषपणे मारहाण केल्यानंतर याचे फोटो समोल आले आहेत. महिलेच्या अंगावर मारहाणी व्रण दिसतं आहे. यामुळे सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करावी अशी मागणी पुढे येत असून वडगाव पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

पीडित महिला ज्ञानेश्वरी अंजान यांनी याबाबत म्हटलं की, मंदिरांवरील भोंगे आणि गिरण्यांची विविध अधिकाऱ्यांकडे मी तक्रारी दिल्या आहेत. त्यातून मला ही मारहाण झाली आहे. ९-१० जणांना मिळून मला बेशुद्ध होईपर्यंत मारहाण केली आहे. मला शिविगाळ करण्यात आली. मला मारहाण झाली तिथे सोडवण्यासाठी कुणीही नव्हतं. ठरवून त्यांनी मला मारहाण केली.

पोलिसांनी मला खूप सहकार्य केले. पोलिसांना मला वेळीच मदत केली म्हणून मी आज तुमच्यासमोर आहे. आरोपींविरोधात मकोका लावून कारवाई करावी. त्यांना जामीन मिळू नये. हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा आरोपींविरोधात झाला पाहिजे. आरोपीचं सरपंच पद काढून घेतलं पाहिजे. आम्हाला संरक्षण देण्यात यावं ही शासनाकडे विनंती आहे, असं ज्ञानेश्वरी अंजान यांनी म्हटलं.

**जितेंद्र आव्हाडांचं ट्वीट !**

जितेंद्र आव्हाड यांनी एक्सवर पोस्ट करत या घटनेकडे सर्वांच लक्ष वेधलं. जितेंद्र आव्हाड यांनी ट्वीटमध्ये म्हटलं की, अंबाजोगाई सत्र न्यायालयात वकिली करणाऱ्या महिलेला सरपंच आणि त्याच्या कार्यकर्त्याकडून शेतात रिंगण करून काठ्या आणि जेसीबी पाईपने जबर मारहाण झाली. महिलेने गावातील ध्वनिप्रदूषणामुळे मायग्रेनचा त्रास होत असल्याने आवाज कमी करावा. लाऊडस्पीकर लावू नयेत, घरापुढील पीठाच्या गिरण्या काढाव्यात, याबाबत कार्यालयीन तक्रारी दिल्या होत्या. महिला बेशुद्ध पडल्यानंतर दवाखान्यातूनही एका रात्रीत उपचार करून घरी पाठवलं आहे. सरपंच आणि इतर दहा पुरूषांनी मिळून एका वकील असलेल्या स्त्रीला मारहाण करणं कितपत योग्य? गावात सरपंचाचा कारभार कसा असेल कोणत्या पक्षाचा हा सरपंच आहे?

**आरोपींविरोधात कारवाई केली जाणार..**

बीडमध्ये ज्या महिलेला अमानुष मारहाण करण्यात आली, तिचे फोटो मला काल रात्री प्राप्त झाले आहेत. जे दोषी असतील त्यांच्यावर योग्य कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी माहिती अजित पवार यांनी दिली आहे.

## थोडक्यात

### काँग्रेसला मोठा हादरा!
### निष्ठावंत नेते संग्राम थोपटेंचा राजीनामा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, पुणे :** विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीसह काँग्रेसला लागलेली गळती काही थांबत नसल्याचे चित्र दिसत आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यामध्ये माजी आमदार रविंद्र धंगेकर यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर काँग्रेसला पुण्यामध्ये आणखी एक सर्वात मोठा धक्का बसण्याची शक्यता असून काँग्रेसचे निष्ठावंत नेते माजी आमदार संग्राम थोपटे हे भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेल्या काही दिवसांपासून काँग्रेस नेते, भोरचे माजी आमदार संग्राम थोपटे हे भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरु आहे. याबाबत आता सर्वात मोठी अपडेट समोर आली असून संग्राम थोपटे यांनी काँग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. ते लवकरच भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करतील, अशी शक्यता आहे.

या पक्षप्रवेशाआधी संग्राम थोपटे यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांची बैठक बोलावली असून या बैठकीत कार्यकर्त्यांशी सल्लामसलत करुन ते पुढील निर्णय घेणार आहेत. महत्त्वाचं म्हणजे काही दिवसांपूर्वीच त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्याची माहितीही समोर आली आहे. त्यामुळे संग्राम थोपटे यांच्या रुपाने काँग्रेसला पुण्यात सर्वात मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

संग्राम थोपटे हे पुण्यामधील भोर विधानसभेचे माजी आमदार आहेत. थोपटे कुटुंबीय हे भोर तालुक्यातील मातब्बर राजकीय घराणे तसेच काँग्रेसचे निष्ठावंत राजकारणी म्हणून प्रसिद्ध आहे. संग्राम थोपटे हे भोरमधून तीन वेळा आमदार म्हणून निवडूण आलेत तर त्यांचे वडील अनंतराव थोपटे हे भोरचे सहा वेळा आमदार होते. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत संग्राम थोपटे यांना पराभवाचा धक्का बसला ज्यानंतर ते भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा आहे.

### वादळी वाऱ्यामुळे नुकसानग्रस्त घरांचे तातडीने सर्वेक्षण करा
### आमदार किशोर जोरगेवार यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, चंद्रपूर :** दिनांक १८ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळच्या सुमारास चंद्रपूर शहरात आलेल्या अवकाळी पावसासह वादळी वाऱ्यामुळे अनेक भागांमध्ये घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा यांना निवेदन देत तातडीने सर्वेक्षण करून नुकसानग्रस्त नागरिकांना आर्थिक मदत मिळवून देण्याच्या सूचना केल्या आहेत. या नैसर्गिक आपत्तीत वाऱ्याच्या जोरामुळे अनेक घरांच्या छपरांवर झाडे कोसळली असून काही घरांची छपरे उडून गेली आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. विजेच्या सुविधा, घरातील साहित्य तसेच इतर मूलभूत सेवाही बाधित झाल्यामुळे नागरिक आर्थिक व मानसिक संकटात सापडले आहेत. आ. जोरगेवार यांनी निवेदनात म्हटले आहे की, सदर नैसर्गिक आपत्तीमुळे नागरिकांच्या घरांचे व मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. काही ठिकाणी घरांचे छत व भिंती कोसळल्या असून अनेकांच्या उपजीविकेवरही याचा परिणाम झाला आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाने या भागाचे तातडीने सर्वेक्षण करून पंचनामे करावेत आणि नुकसानग्रस्तांना शासनाकडून आर्थिक मदतीसाठी प्रस्ताव त्वरीत सादर करावा. तसेच जिल्हा प्रशासनाने या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात. सदर नैसर्गिक आपत्तींमुळे अनेक भागांचा विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. महावितरणनेही युद्धपातळीवर काम करून विद्युत पुरवठा सुरळीत करण्याच्या सूचनाही आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

## नारळी सप्ताहाच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य - मुख्यमंत्री फडणवीस



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, बीड :** बीड जिल्ह्याला नारळी सप्ताह, अध्यात्म व विचारांची मोठी परंपरा लाभली आहे. संत वामनभाऊ यांनी सुरू केलेली सप्ताहाची परंपरा अखंडपणे ९३ व्या वर्षापासून सुरू आहे. या परंपरेच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. गहिनीनाथ गडाचा विकास करताना बीड जिल्ह्याला पाणीदार जिल्हा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिरूर कासार तालुक्यातील घाटशीळ पारगाव येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ९३ व्या नारळी सप्ताहासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मठाधिपती विठ्ठल बाबा महाराज, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, आमदार सर्वश्री सुरेश धस, नमिता मुंदडा, मोनिका राजळे, माजी आमदार जयदत्त क्षीरसागर, माजी आमदार भीमराव धोंडे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा, जिल्हाधिकारी अविनाश पाठक उपस्थित होते.

श्री.फडणवीस पुढे म्हणाले, गहिनीनाथ गडाच्या विकासाचे काम सुरू असून अजूनही पुढे विकासाची ही कामे करायची आहेत. संतानी दाखविलेला भक्तीचा मार्ग समाजाने सोडलेला नाही. समाज घडविणाऱ्या या परंपरेत समाजातील सर्व घटकांचा सहभाग दिसून येत आहे. यामध्ये मुस्लिम समाज बांधव देखील सहभागी झाले, याचा आनंद आहे. आमचे नेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्यामुळे बीड जिल्ह्याशी वेगळे नाते निर्माण झाले आहे. आज मला वामनभाऊंच्या या सप्ताहाच्या परंपरेत सहभागी होऊन आशीर्वाद घेता आला याचा मनस्वी आनंद असल्याचे ते म्हणाले.

गहिनीनाथ गडावर येणाऱ्या प्रत्येक भक्ताची उत्तम व्यवस्था झाली पाहिजे, गडासोबतच या परिसरातील भाविकांच्या सोई सुविधांचा तसेच या परिसराचा देखील विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगून श्री.फडणवीस म्हणाले, मराठवाडा व बीड जिल्ह्याला कायमस्वरुपी दुष्काळमुक्त करण्यासाठी शासनाने कृष्णेचे पाणी आष्टीपर्यंत आणले आहे. ते पाणी संपूर्ण बीड जिल्ह्यात पोचविण्याचा आपला प्रण आहे. मराठवाडा व बीड जिल्ह्याला पाणीदार करण्यासाठी ५३ टीएमसी पाणी गोदाखोऱ्यात आणण्याच्या आराखड्याला देखील मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे या परिसरातील दुष्काळ कायमचा मिटेल. आजच्या या पिढीने दुष्काळ पहिला, तो पुढच्या पिढीला पाहू देणार नाही, असेही श्री.फडणवीस यांनी स्पष्ट केले.

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, संत वामनभाऊ, संत भगवान बाबा यांनी या भागातील लोकांना आध्यात्मिक गोडी निर्माण करणारी सप्ताहाची परंपरा सुरू केली, ती अखंडपणे सुरू आहे. गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी तसेच बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री आपल्यासोबत आहेत. त्यामुळे येत्या काळात बीड जिल्हा नक्कीच सुजलाम, सुफलाम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी गडाचे मठाधिपती विठ्ठल महाराज यांनी संत वामनभाऊ यांनी ९३ वर्षापूर्वी सुरू केलेल्या अखंड नारळी सप्ताह परंपरेबाबत माहिती दिली. यावेळी बीड, अहिल्यानगर जिल्ह्यातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आर्चरी खेळाडू प्रथमेश जावकार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने सन्मानित




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, बुलडाणा :** जिल्ह्यातील आंतराष्ट्रीय आर्चरी खेळाडू प्रथमेश समाधान जावकार यांच्या कामगीरीची दखल घेवून महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत सन २०२३-२४ चा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. पुरस्कार वितरण सोहळा दि. १८ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता शिवछत्रपती क्रीडा क्रीडापीठ (बॅडमिंटन हॉल) म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या शुभहस्ते व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व इतर सन्माननीय मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. पुरस्काराचे स्वरुप ३ लाख रुपये रोख, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र पुष्पगुच्छ प्रदान करुन मान्यवरांच्या शुभहस्ते प्रथमेश समाधान जावकर यांना सन्मानीत करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी बी.बी. महानकर यांनी दिली.

## अंबरनाथमध्ये रासायनिक कंपनीला भीषण आग




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, अंबरनाथ :** अंबरनाथच्या मोरीवली एमआयडीसीतील रासायनिक कंपनीला लागलेल्या भीषण आगीत संपूर्ण कंपनी जळून खाक झाली. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मोरीवली एमआयडीसीत स्पीड इंटरनॅशनल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड नावाची रासायनिक कंपनी आहे. या कंपनीत पोटॅशियम परमॅग्नेटचं उत्पादन केलं जातं.


या कंपनीत संध्याकाळी ६ वाजताच्या सुमारास रासायनिक प्रक्रियेदरम्यान आग लागली. कंपनीत केमिकलचा मोठा साठा असल्यामुळे काही क्षणातच ही आग भडकली आणि कंपनीत मोठमोठे स्फोट होऊ लागले. मात्र कंपनीतील कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत कंपनीच्या बाहेर पळ काढल्याने कुणालाही इजा झाली नाही.

या आगीनंतर कंपनीवर अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. या कंपनीकडे इन ऑरगॅनिक कंपाऊंड प्रोडक्शन लायसन्स असून त्यामध्ये ज्वलनशील रसायनांचा समावेश नसतो. मात्र तरीही कंपनीने डाय इथाईल ऑगझोलेट, इथाईल अल्कोहोल यांसारखे ज्वलनशील ऑरगॅनिक केमिकल कंपनीत ठेवल्याची चर्चा आहे. त्यामुळे कंपनीत मूळ उत्पादन सोडून दुसरंच उत्पादन सुरू होतं का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

## संपादकीय



### ज्ञानापेक्षा शहाणपणा महत्त्वाचा



शिक्षण आणि ज्ञानाच्या माध्यमातून माणसाला शहाणपणा मिळतो. मात्र, केवळ ज्ञान असून उपयोग नाही, जर ते योग्य प्रकारे वापरण्याचे शहाणपण असायला हवे . जसे तलवार असली तरी ती चालवता येत नसेल, तर तिचा उपयोग शून्य ठरतो. त्याचप्रमाणे, ज्ञान असले तरी त्याचा व्यवहारात उपयोग करण्याची समज नसल्यास ते निरुपयोगी ठरते.

आज समाजात पाहिले,तर असे आढळते की अनेकांनी आपला शहाणपणा गहाण ठेवला आहे. व्यसनामुळे स्वतःचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक नुकसान होत असल्याचे ज्ञान असूनही, अनेकजण व्यसनाच्या आहारी जातात. हे दर्शवते की त्यांच्याकडे शहाणपणा नसल्यामुळे ते आपल्या जीवनावर नियंत्रण ठेवू शकत नाहीत.

शहाणपणा हा फक्त ज्ञानातूनच नव्हे, तर अनुभवातूनही मिळतो. अनुभवी आणि शहाण्या व्यक्तींच्या मार्गदर्शनानेही तो प्राप्त होतो. काहीजण संकटांत सापडल्यावर शहाणे होतात, तर काहीजण अहंकारामुळे शहाण्या लोकांचे सल्ले ऐकण्यास नकार देतात. मला शहाणपणा शिकवू नको! असा त्यांचा दृष्टिकोन त्यांना मागे ओढत राहतो. काही जणांना भौतिक प्रगती मिळाल्यावर वाटते की, तेच सर्वात शहाणे आहेत. दोन-चार गाड्या, मोठे बंगले आणि भरपूर जमीन म्हणजेच शहाणपणा, असा गैरसमज त्यांच्या प्रगतीसाठी घातक ठरतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, माणसाने आयुष्यभर जरी शिकायचे ठरवले, तरी तो ज्ञानसागराच्या केवळ कडेलाच पोहोचू शकतो. याचा अर्थ, ज्ञान हे अथांग आहे ; आणि माणूस संपूर्ण जीवनात त्यातील अत्यल्प भागच आत्मसात करू शकतो. त्यामुळे ज्ञानाचा उपयोग करून शहाणपणा मिळवणे अधिक महत्त्वाचे ठरते. तो शहाणपणा आधी स्वतःसाठी, नंतर समाज, देश आणि मानवतेच्या कल्याणासाठी वापरला पाहिजे.

ज्ञानाचे शहाणपणात रूपांतर होण्यासाठी ग्रंथलेखन महत्त्वाचे आहे. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या हितासाठी केला. त्यांच्या ग्रंथांचे आजही पारायण केले जाते. अनेकांचे जीवन या ग्रंथांतील उपदेशामुळे सकारात्मक बदलले आहे. एका ज्योतीने हजारो ज्योती प्रज्वलित होतात, या प्रमाणे हे ग्रंथ समाजाला नीतिमत्ता आणि सदाचाराचे मार्ग दाखवतात. बहिणाबाई चौधरी यांसारख्या अशिक्षित कवयित्रीने आपल्या व्यवहारज्ञानातून मिळालेला शहाणपणा आपल्या हृदयस्पर्शी कवितांमधून मांडला:

**जग जग माझ्या जीवा**
**असं जगनं तोलाचं**
**उच्च गगनासारखं**
**धरत्रीच्या रे मोलाचं**

जीवनाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन त्यांच्या कविता देतात. लेखक, विचारवंत आणि साहित्यिक हे लोकांना आपल्या लेखनाच्या माध्यमातून जीवन जगण्याची योग्य दिशा दाखवतात. त्यांनी मांडलेल्या विचारांमुळे अनेकांना आनंददायी, समाधानी आणि सुसंस्कृत जीवन जगता येते.

'पुढच्यास ठेच, मागचा शहाणा' या म्हणीनुसार अनुभवी आणि वडीलधाऱ्या व्यक्तींच्या सल्ल्याचा आदर केला पाहिजे. अनुभवातून मिळालेला शहाणपणा शेवटी जीवन समृद्ध करण्यासाठीच असतो. म्हणूनच, ज्ञानापेक्षा शहाणपणा महत्त्वाचा असतो!

## गोड आठवणीतील रसाळ आंबा...

जि.प.मराठी शाळेच्या वार्षिक परीक्षा साधारण एप्रिलच्या पहिल्या, दुसऱ्या आठवड्यात संपायच्या.गुरुजीं पंधरा ते वीस दिवसात पेपर तपासून मे च्या एक ला महाराष्ट्र दिनाच्या ध्वजारोहणा बरोबर आम्हां विद्यार्थी कामगारांचंवर्षभराचं शैक्षणिक विकासाचे प्रगतीपत्र हाती यायचं. शाळेत पहिला नंबर, दुसरा नंबर जरी नाही आला तरी पुढील वर्गात ढकलण्यापुरते मार्क पडले तरी पुरे....! पण या एवढ्या मार्कावरही एक नारळ मारुतीरायाच्या पायरी जवळच्या दगडावर फुटायचाच...!त्यासह खडीसाखर मित्र मंडळीना वाटली की, पुढील दोन महिने उन्हाळ्याच्या सुट्ट्याची मज्जा करायला मोकळे ! शाळेला जास्त प्रमाणात दोन वेळेस सुट्ट्यां असायच्या. त्यापैकी एक उन्हाळा अन दुसऱ्या दिवाळीच्या. लहानपणी सुट्ट्यांमध्ये मामाच्या गावी जायचो.मामाकडे शेतीवाडी असल्यामुळे शेतीचं खूप आकर्षण होतं कारण, आमच्याकडे शेती नव्हती.शेतातील झाडे, विहिरी, काळी माती, शेतीतील पीक बघून खूप छान वाटायचं. कारण दुसऱ्याच्या शेतातील जो परकेपणा मामाच्या शेतात जाणवत नव्हता. मेच्या एक ला वार्षिक परीक्षेचा निकाल लागला म्हणजे तेव्हापासून दोन महिने उन्हाळ्याच्या सुट्ट्यात मामाच्या गावाला जायचो. मामाचे शेत गावापासून जवळपास दीड ते दोन किलोमीटर अंतरावर होते.एवढ्या कडक उन्हाळ्यातही पायात स्लीपर चप्पल घालून डोक्याला रुमाल बांधून जायचो.! शेतामध्ये घनदाट आंब्याचे झाडे, बाजूलाच एक विहीर, समोर पाण्याचा कालवा. या कालव्याला उन्हाळ्यातही थोडेफार खळखळ वाहणारं पाणी असायचं.शेताच्या बांधावर आंब्याचेच परंतु वेगवेगळ्या चवीचे झाडे होते. आंब्याच्या झाडाच्या सावलीत आम्ही भावंडे व तेथील मित्रमंडळीसोबत खेळायचो. साधारण याच काळात आंब्याला बऱ्या प्रमणात कैऱ्या लटकलेल्या असायच्या. त्यापैकी विशेषतः शोप्या,खोबऱ्या, लाल्या, चिकाळ्या, साखऱ्या, लंगडा वगैरे हे नाव त्यांना त्यांच्याच चवीने भेटले असेल.

आजी आजोबांनी लावलेल्या आंब्याच्या तोडलेल्या पहिल्या कैरीच्या चवीवरून त्यांचे नाव पडले असावे. आजी आजोबांनीच त्यांना अशी नावे ठेवले असावे असे वाटते.पहिला शोप्या.याची कैरी विळ्याने कापली तर,त्याची चव शोप खाल्ल्यासारखी यायची. दुसरा खोबऱ्या नावाचा. याची कैरी कापली तर, आतून पांढरट नारळातील आतील भागाप्रमाणे होता. खोबरं खाल्ल्यासारखा वाटायचं, तिसरा लाल्या आंबा. हा झाडावरच अर्धा भागात लालसर व्हायचा. जणूकाही पिकलाच परंतु, कापल्यावर आतून पांढरा, पिवळसर दिसायचा.मात्र जेव्हा हा पूर्ण पिकायचा तेव्हा त्याचा रस पूर्ण लालसर रंगाचा व्हायचा. म्हणून त्याला लाल्या म्हणायचे. त्यानंतर चिकाळ्या आंबा. याच्या देठाजवळ भयंकर चिकट पदार्थ असायचा. तो तोडला तर हात पूर्ण चिकट-चिकट व्हायचा,मग त्याच्या देठाकडील चिकट पदार्थ प्रथम काढून टाकावा लागे,नाहीतर शर्टाचा व हाफ चड्डीच्या खिसा पूर्ण खराब व्हायचा. साखऱ्या हा अतिशय गोड. याचा आमरस बनवला की,आमरसात साखर टाकायची गरज नव्हती. म्हणून त्याला साखऱ्या म्हणायचो. अजून एक चमत्कारिक नावाचाआंबा आणि तो म्हणजे लंगडा आंबा. ऐकून थोडसं नवलच वाटेल परंतु होताच लंगडा...! गावाकडील बोली भाषेत पत्त्यातील सातला लंगडा म्हणतात. ह्या आंब्याचा आकार इंग्रजीतील साताप्रमाणे दिसायचाम्हणून त्याला लंगडा आंबा म्हणायचे. किती! आगळ -वेगळे नाव हे...! खरंच! नावे ठेवण्याला ही भयंकर कल्पनाशक्तीची सांगड घातली असे वाटते.

शेतात आजी-आजोबा,मामा मामीं काम करायचे. उन्हाळ्याच्या दिवसात नांगरणी झाल्यावर काडी-कचरा जमा करायचे. बांधावरील वाळलेलं गवत जमा करायचे. तेच गवत आंबे पिकवायला कामी यायचे. आम्ही भावंडे व मित्र आंब्याच्या घनदाट सावलीमध्ये वेगवेगळे खेळ खेळायचो. कैऱ्या खाव्याश्या वाटल्या की, दगडाचा नेम धरून पाडायचो. माझ्याकडून फारसा नेम बसत नव्हता मात्र, मोठ्या भावाचा नेम बरोबर बसायचा अन कैरी टपकन खाली पडायची.ताई आणि मी खाली पडलेल्या कैऱ्या जमा करायचो.आम्ही आंब्याच्या कैऱ्या खाण्यासाठी घरून लाल मिरची पावडर आणि मीठ घेऊन यायचो. मिरची पावडर अन मिठाचा मिश्रित मसाला डाव्या हातावर घेतला की, दातानेच आंबा उंदरासारखा कुडतडून त्या मिठ अन मिरची पावडरच्या मिश्रणाला लावुन खायचो. आंब्याचा आंबट मिरची पावडरचा तिखट अन मिठाची खारट अशी छान खट्टी-मिट्ठी चव यायची. दात अगदी आंबून जाईपर्यंत अन तोंड वाकडेतिकडे करून एक डोळा अर्धवट मिटवून कच्च्या कैऱ्या खायचो. ती चव अजूनही कायमची स्मरणात आहे. मोठमोठ्या आकाराच्या दहा-वीस किलो कैऱ्या तोडून घरी आणल्या की, मोठ्या अडकित्त्याने त्याचे छोट्या -छोट्या भागात तुकडे करायचे. आजी छान असा तीळ,मोहरीचा घरगुती मसाला बनवून लोणचे बनवायची.एका चिनी मातीच्या बरणीमध्ये वर्षभर पुरेल असे बनवून ठेवायचे. जस जसं लोणचे मुरले की, त्याची चव खूप छान लागायची. शाळेत भाकरीच्या तुकड्यावर हिरवी मिरचीचा ठेचा आणि दोन-चार लोणच्याच्या फोडी टाकल्या की, आमचा टिफिन तयार....! अशी ही कैरीच्या लोणच्याची खट्टी- मिट्ठी चवीची डोळे मिटवून आठवण केली की, तोंडाला नक्कीच पाणी सुटतं. आंब्याच्या आतील कोय (कोयटी) टनक झाली की, हळूहळू त्यात गोडवा यायला सुरुवात होते. त्याचा आतून रंग लाल किंवा पिवळसर होऊ लागतो. देठाजवळील भाग पहिल्यापेक्षा थोडा कमकुवत होतो. जर दगडाने पाडण्याचा प्रयत्न केला तर थोड्याशा स्पर्शाने खाली पडायचा. आम्ही त्याला शाक म्हणायचो. त्याला गोडसरपणा आल्यामुळे मीठ, मिरची पावडर मसाला वगैरे न लावताच खायची मजा वेगळी असायची. साधारण अक्षय तृतीयेच्या दहा पंधरा दिवस अगोदर जवळपास सर्व आंबे या स्थितीत आल्यावर त्याला झाडावरून खाली उतरवावे लागायचे. मग मामा व त्यांचे सहकारी मित्र एका लांब काठीला एक जाळी बांधून त्याला लोखंडाच्या अनुकुचीदार पट्ट्या किंवा खिळे लावून ती आंबा उतरवायची काठी घेऊन झाडावर चढायचे. जाळीच्या आतील अनुकूचिदार खिळ्याचा आंब्याच्या देठाला स्पर्श केल्यास तो,जाळीत पडायचा. हळूहळू दोन-चार जमा झाले की, खाली उभ्या असलेल्या व्यक्तीकडे जाळीचा भाग करून त्यातील कैऱ्या पोत्यात भरून ठेवायचा. असे सर्व आंबे झाडावरून खाली उतरवले की,भरलेले पोते भरून गावाजवळच्या गाई- म्हशींसाठी बनवलेल्या गोठ्यात आणून ठेवायचे.अगदी नैसर्गिक पद्धतीने आंबे पिकवल्या जायाचे. या गावठी पद्धतीने पिकवलेल्या आंब्याला गावरान आंबा म्हणतात. गव्हाचे भूस,वाळलेल्या गवतात ठेवल्या जायचे. हळूहळू आंबे पिकायला सुरुवात व्हायची.गोठ्याच्या आत शिरले की, छान, सुंदर असा वास यायचा. गाई म्हशिंचा गोठा अगदी साध्या पद्धतीने बनवलेला असायचा. तुरीच्या काड्यांपासून चारी बाजूला कुंपण तर मका,ज्वारी व बाजरीचे धांडे किंवा इतर काड्यांपासून झोपडी बनवलेली असायची. अन लाकडी फाटक सुद्धा अगदी साध्या पद्धतीनेच बनवलेले असायचे. केवळ साध्या तारांपासून बनवलेला जुगाडी कडी-कोंडा असायचा. हे फाटक साधारण चार-पाच फूट उंचीचेच असायचे. एवढे-गोड रसाळ आंबे गोठ्यात पिकायला ठेवलेले असतांनाही कुठल्याही प्रकारचे मोठे कुलूप नाही. ना फारसी रखवाली. किती ! हा विश्वास गावातील लोकांवर.खरच शेतकऱ्यांचं हृदय खूप मोठं असतं. शेतातील खायच्या वस्तू खाऊ घालताना कधीच मागे पुढे पाहत नाही. अगदी मनापासून खाऊ घालतात. तशीच इमानदारीही तेवढीच मात्र, आम्ही पोरं लाकडी फाटकावरून उड्या मारून गोठ्यातील गोड-रसाळ आंबे चोरून खायचो..!

अक्षय तृतीयेला आमरस, पुरणपोळी, पापड कुरडया,शेवया कांद्यांची भाजी नाहीतर बटाट्याची भाजी असा जेवणाचा चवदार बेत असायचा.अगदी नैसर्गिक स्वरूपाने पिकवलेला आंब्याच्या गोड रसाची चव खूपच आगळी-वेगळी होती.अक्षय तृतीयेच्या सणानंतरही आठवड्यातून एक दिवस किंवा पाहुणे आले तर,त्यांना आमरसाचा पाहुणचार असायचा. त्याचबरोबर गावाकडचे मानलेले मामा,गुरु-मामा, काका यांच्याकडे सुद्धा अधून -मधून संपूर्ण कुटुंबाला आमरसाचे आमंत्रण असायचे. आम्ही सुद्धा त्यांना आमरस जेवायला बोलवायचो. खेड्यापाड्यातील जीवनामध्ये एकमेकांविषयी मनामध्ये स्वच्छ निर्मळ प्रेमळ भावना राहते.निःस्वार्थ प्रेम,साधा भोळेपणा, सहकार्य वृत्ती खरंच शिकावं तर खेड्यातील माणसांकडूनच...! आंब्यातील रस काढून निघालेल्या कोयी आम्ही मुलं जमा करायचो. त्याला दगडाने ठेचून टनक आवरणाच्या आतील भागातील लांबट चपट्या आकाराची बी काढायचो. ही बी दोन ठिकाणी वापरायची. प्रथम म्हणजे दगडाच्या खरबडीत भागावर किंवा पाटा-वरवंट्यातील पाट्यावर बी ची एक बाजू तिरकस घासून, त्यातील फटीमध्ये एक हिरवे तुळशीचे पान टाकून शिट्टी बनवायचो. तोंडात धरून तोंडातून शंखा सारखी तोंडाने हवा भरून वाजवायचो. त्यातून सुमधुर असा आवाज यायचा. खरंच! काय अफलातून कल्पनेतील जुगाडी शिट्टी असायची ना! पूर्ण अगदी बिन खर्चिक....! त्यानंतर कोयीतील बी चा दुसरा उपयोग म्हणजे, दगडाने ठेचून त्यातील आतली बीया वाळवून जमा करून ठेवायचो. एक रुपया किंवा दीड रुपया किलोने विकायचो. कोय फोडताना हातावर कितीतरी वेळेस दगडाचे दणके बसायचे परंतु, त्यावेळेस कसल्या जखमा आणि कसल्या इजा....!केवळ एक- दोन रुपयासाठी किती हा खटाटोप...! आज आठवणी काढल्या तर डोळ्यातून अश्रू वाहतात. काय ते जीवन जगणं होतं खरचं ! छोट्या छोट्या गोष्टीत ही खूप आनंद शोधत होतो. आताच्या या भ्रमणध्वनी, दूरदर्शन,संगणकाच्या काळात लहान-लहान मुलच काय तरुण मंडळीसुद्धा तासंतास भ्रमणध्वनी, दूरदर्शन मध्ये गुंतून राहतात. त्यांना कसल्या ह्या जीवनाचे अनुभव. गावाकडचे जीवन नद्या,नाले, तलाव,आमराई आंब्याच्या झाडाच्या फांद्यावरील खेळणे, दगड मारून कैऱ्या पाडणे. खरंच जीवन जगण्यातील कित्येक आठवणी या आंब्याच्या रूपाने हृदयात साठवलेल्या आहेत.हल्लीच्या वातावरणाकडे बघून तर असं, वाटतंय झाडावरील आंबे स्वतः कंटाळून खाल्ली पडत असतील. कारण त्यांना माहीत माहित आहे की, भर उन्हाळळ्यात दगडाचा नेम धरून कच्च्या कैऱ्या पाडणारे बालपण आता मोबाईल मध्ये हरवलंय..!

असा हा आंबा चैत्रात येणाऱ्या कोवळ्या हहोरा पासून मोहात टाकणारा आहे तर कच्च्या कैऱ्याचं लोणचं, अर्धवट पिकलेल्या शाका, शेतातून उतरून आणलेला नैसर्गिक रित्या पिकांचे भूस,गवतात पिकवलेला अन फाटकावरून उडी मारून चोरून खाल्लेला आंबा अन त्याच्या रसानं भरलेलं अखब तोंड आणि शर्टावरील आंब्याच्या गोड -गोड रसाचे डाग डोळ्यासमोर आठवणीच्या रूपाने घिरट्या घालताय.आई व आजीने केलेला आमरस आणि त्यात बुडवून खाल्लेली पुरणपोळी आणि शेवयाचा भात तर,अजूनही तोंडाला पाणी सोडतो. अहो ! एवढेच काय आंब्याच्या रस काढून फेकलेल्या कोया सुद्धा वाया न जाऊ देणारे आम्ही पोरांनी,त्यातील बी पासून शिट्टी बनवली. आणि त्याही पलीकडील आई अण्णांनी सांगितलेली हृदय हेलावून गोष्ट अशी की,गरीब परिस्थिती अन दुष्काळात घरात खायला नसल्यामुळे याच आंब्याच्या कोयीतील बिया चुलीवर उकडून त्यात मीठ टाकून खालल्या.कदाचित ! ऐकून नवल वाटेल पण, पोटाची आग विझवण्यासाठी हा आंबा इथेही उपयोगी पडला. हे सर्व सांगताना डोळ्यातून अश्रू येतात असा हा आंबा कसा विसरला जाईल. आजही स्मरणात आहे व भविष्यातही स्मरणात राहील.

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मु.पो. मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

## ईस्टर संडे

रोमन सैनिकांचा
हैदोस तो उच्छाद
त्रास देती येशूला
क्रूर तम छळवाद

ते क्रूरकट्टर पंथीय
माते अति उन्माद
क्रुस साक्षात मृत्यू
मानवते करे बर्बाद

तरीही येशू बोलले
कुणा नसे अपराध
माफकर मारेक-यां
देती तया धन्यवाद

असली कणव मूर्ती
स्नेह तिला अमर्याद
सांगे सुविचार जगा
साधावा नित्यसंवाद

येशू तव पुनरागमन
सुखानंदाचा निनाद
आठवण मसिहाची
चर्च मधला घंटानाद

ईस्टरसंडे शुभचिंतन
आनंद देतो मनमुराद
चालता त्या वाटेवरी
पूर्णत्वास नेई मुराद

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

## महाराष्ट्राचा बहुमान !

महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई हे लवकरच भारताचे नवे मुख्य सर न्यायाधीश म्हणून शपथ घेतील. भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांनी त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून १४ मे पासून ते भारताचे मुख्य सर न्यायाधीश म्हणून सूत्र हाती घेतील. विद्यमान सर न्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येत आहे.

न्यायमूर्ती भूषण गवई हे भारताचे ५२ वे सर न्यायाधीश असतील. याआधी न्या. प्रल्हाद गजेंद्रगडकर, न्या. यशवंत चंद्रचूड, न्या. सॅम भरूचा, न्या. सरोश कपाडिया, न्यान शरद बोबडे, न्या. उदय लळीत, आणि न्या. धनंजय चंद्रचूड या सात मराठी न्यायमूर्तींना हा मान मिळाला आहे. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई यांना भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु या पुढील महिन्यात १४ तारखेला सर न्यायाधीशपदाची शपथ देतील त्यावेळी इतिहास रचला जाईल.

भारताचे सर न्यायाधीश म्हणून शपथ घेणारे भूषण गवई हे केवळ दुसरेच दलीत न्यायमूर्ती आहेत याआधी के जी बालकृष्णन पहिले दलीत सर न्यायाधीश बनले होते. न्यायमूर्ती भूषण गवई यांची देशाच्या सर न्यायाधीशपदी नियुक्ती होणे हा महाराष्ट्राचा



बहुमान होय कारण ते महाराष्ट्राचे सुपुत्र आहेत. रीपाई नेते व माजी राज्यपाल रा सू गवई यांचे सुपुत्र असलेले न्यायमूर्ती भूषण गवई यांचा जन्म अमरावतीत झाला असून त्यांचे प्राथमिक व कायद्याचे शिक्षण मुंबईत झाले. मुंबईतच त्यांनी वकिली सुरू केली. २००५ मध्ये त्यांची उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली. वकील आणि न्यायाधीश म्हणून त्यांना दांडगा अनुभव आहे.

छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पणजी येथे त्यांनी न्यायाधीश म्हणून काम केले आहे. २४ मे २०१९ रोजी त्यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायाधिश म्हणून नियुक्ती झाली. अनेक ऐतिहासिक आणि महत्वपूर्ण निकाल न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दिले आहेत. नोटबंदी वैध ठरवणारा २०२३ चा निर्णय त्यांच्या कारकिर्दीतील महत्वाचा निर्णय ठरला. जम्मू काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवण्याचा निर्णय देणाऱ्या घटना पिठाचा ते भाग होते. प्रशांत भूषण अवमान प्रकरणात निकाल देणाऱ्या खंडपीठाचाही ते भाग होते. कायद्याचे सखोल ज्ञान, सर्वांना सोबत घेऊन जाण्याचे कौशल्य, नेतृत्वगुण, वंचित आणि उपेक्षितांबद्दलचा कळवला या गुणांमुळे ते आधीच लोकप्रिय आहेत.

न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या निवडीचा मराठी माणसांना अभिमान आहे. न्यायालय आणि न्यायालयीन कामकाज याविषयी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात अजूनही काही प्रश्न आहेत. न्यायालयात जलद न्याय मिळत नाही, सर्वसामान्य नागरिकांनी न्यायालयाची पायरी चढूच नये अशी भावना सर्वसामान्य नागरिकांची आहे. सर्वसामान्य नागरिकांची ही भावना खोटी ठरवून जलद न्याय देण्याबरोबरच न्यायव्यवस्थेवरील सर्वसामान्यांचा विश्वास दृढ करण्याची जबाबदारी न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर आहे त्यात ते यशस्वी होतील यात शंका नाही. देशाचे नवे सर न्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचे मनापासून अभिनंदन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## टाकळी ढोकेश्वर गटातून राष्ट्रवादीच्या सभासद नोंदणी अभियानाला सुरुवात

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सभासद नोंदणी अभियानाला पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटातून उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी आमदार काशिनाथ दाते आणि जिल्हा अध्यक्ष अशोक सावंत यांच्या नेतृत्वाखाली पक्ष बांधणी आणि विस्ताराला गती दिली आहे. या अभियानाच्या माध्यम ातून सामान्य नागरिकांना पक्षाशी जोडण्याचा आणि पक्ष संघटनेची ताकद वाढवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. टाकळी ढोकेश्वर गटातील भोंद्रे, काकणेवाडी, तिखोल, ढोकी आणि टाकळी ढोकेश्वर या गावांमध्ये सभासद नोंदणी अभियानाचा शुभारंभ आमदार काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या प्रसंगी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष रखमाजी कापसे, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, युवक तालुका अध्यक्ष भास्कर उचाळे यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सभासद नोंदणीच्या महत्त्वावर प्रकाश टाकत, यामुळे पक्षाच्या स्थानिक पातळीवरील बांधणीला बळ मिळेल, असे मत व्यक्त केले.या अभियानाच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना पक्षाच्या विचारधारेशी आणि कार्याशी जोडण्यावर भर देण्यात येत आहे. सभासद नोंदणीमुळे पक्षाची ग्रामीण भागातील ताकद वाढणार असून, कार्यकर्त्यांना नवीन जबाबदाऱ्या स्वीकारण्याची संधी मिळणार आहे. पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने यापूर्वीही जनतेच्या प्रश्नांसाठी सक्रिय भूमिका घेतली आहे. याच धर्तीवर, या अभियानातून पक्षाला नवसंजननी मिळेल, असा विश्वास तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी व्यक्त केला. त्यांनी कार्यकर्त्यांना जास्तीत जास्त सभासद जोडण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमात उपस्थित कार्यकर्त्यांनी गावागावांत सभासद नोंदणीला गती देण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी ग्रामस्थांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेत पक्षाच्या या उपक्रमाचे स्वागत केले. सभासद नोंदणी अभियानामुळे पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद वाढण्यास मदत होईल, असा आशावाद व्यक्त होत आहे. येत्या काळात तालुक्यातील इतर गटांमध्येही हे अभियान राबवले जाणार आहे. यापूर्वी पारनेर तालुक्यात आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखाली आयोजित जनता दरबारातही नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न झाला होता. त्या धर्तीवर, सभासद नोंदणी अभियान हे पक्षाला जनमानसात अधिक जवळ आणण्याचा आणि सामान्य लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

## गांजीभोयरे गावात अवतरले रामराज्य !

### भक्तपंढरी सोहळ्याचा ग्रामस्थांनी लुटला आनंद



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील गांजीभोयरे येथे सात दिवसांपासून भक्तपंढरी व हनुमान जन्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला होता या सोहळ्यासाठी ह.भ.प रामायणाचार्य मनोहर महाराज सिनारे (राहुरी) यांच्या रामायण कथेचे आयोजन करण्यात आले होते. रामायण कथेसाठी गावचे सुपुत्र आणि प्राध्यापक ह.भ.प गंगाराम महाराज खोडदे सर यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी पारनेर, सिद्धेश्वरवाडी, पानोली, वडूले,सांगवीसुर्या, जवळा, निघोज राळेगण थेरपाळ, राळेगण सिद्धी, गुणवरे, म्हसे,वडझिरे या परिसरातील गावातून कथा ऐकण्यासाठी भाविक दररोज मोठी गर्दी पहायला मिळाली. गावकऱ्यांच्या वतीने भाविकांसाठी सात दिवस अन्नदान महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी विशेषतः सर्वात जास्त महिला बघिनींची गर्दी पहायला मिळाली. गावातील काही तरुण मुला मुलींनी राम लक्ष्मण आणि सीता, हनुमान याच्या पात्रांची वेशभूषा करून सर्व भाविकांचे लक्ष वेधून घेतले होते. भक्तपंढरी सोहळा समितीच्या वतीने प्राध्यापक ह.भ.प गंगाराम महाराज खोडदे यांनी भाविकांचे आभार व्यक्त केले.

## तहसील कार्यालयाच्या वतीने ईकेवायसी शिबिराचे आयोजन



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१९, मुदखेड (नांदेड) :** राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आज दि.१७ एप्रिल रोजी तहसील कार्यालय, मुदखेड मार्फत राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या पात्र लाभार्थींच्या १०० टक्के EKYC मोहिमेअंतर्गत ज्या वृद्ध, लहान मुले व इतर लाभार्थीचा बायोमेट्रिक डेटा अद्यावत नसल्यामुळे EKYC करण्यात अडचणी येत होत्या त्या लाभार्थी करीता तालुक्यातील विविध गावांमध्ये शिबिराचे आयोजन करण्यात आले, यामध्ये तहसील कार्यालय मुदखेड , ग्रामपंचायत कार्यालय वासरी, व माळकौठा आदी ठिकाणी या शिबिराचे आयोजन करून सदरील लाभार्थींचे आधार अद्यावत करण्यात आले.

यावेळी तहसीलदार आनंद देऊळगावकर, नायब तहसीलदार समीर पोहणे, तलाठी महसूल कर्मचारी आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्राच्या १५९ क्रीडावीरांचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांने गौरव

**पवारजी निधी देताना शिष्टचार पाळू नका - राज्यपाल**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या भाषणात मला शिष्टचारानुसार केवळ पाच मिनिटे बोलण्यास दिले असल्याचे सांगितले होते. हाच धागा पकडून राज्यपाल राधाकृष्णन यांनी आपल्या भाषणात अजित पवार जी तुम्ही तुमच्या भाषणात वेळेचा शिष्टचार पाळला. पण क्रीडा विभागाला निधी देताना कुठलाही शिष्टचार पाळू नका. अधिकाधिक निधी या विभागाला द्या.





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, पुणे :** देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धा भारतात व्हाव्यात यासाठी प्रयत्न करीत असून, महाराष्ट्रातील आपल्या खेळाडूंना ऑलिम्पिकसाठी सज्ज व्हावे, 'विकसित भारत' बाबत चर्चा करत असतानाच आपण ऑलिंपिकमध्येही सर्वाधिक पदके मिळविण्याबाबतही विचार केला पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराच्या समारंभात केले.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आयोजित शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, पणनमंत्री जयकुमार रावल, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर व क्रीडा आयुक्त हिरालाल सोनवणे, राज्याचे क्रीडा सहसंचालक सुधीर मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुलात २०२२-२३ व २०२३-२४ असे दोन वर्षांच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सोहळा दिमाखदार वातावरणात पार पडला.ज्येष्ठ आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू प्रदीप गंधे यांना, तर माजी राष्ट्रीय कबड्डीपटू, संघटक शकुंतला खटावकर यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. पॅरा ऑलिम्पिक पदक विजेता सचिन खिलारी, जागितिक विजेते आर्चर आदिती स्वामी, ओजस देवतळे यांच्यासह राज्यातील १५९ जणांचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांने सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्राचा इतिहास पाहता उद्योग, शिक्षण,सामाजिक सुधारणा किंवा क्रीडा क्षेत्र असो महाराष्ट्राने देशाचे अनेक क्षेत्रात नेतृत्व केले आहे, असे प्रतिपादन करून राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन पुढे म्हणाले की, राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये आज क्रीडा संकुल उभे करण्यात राज्य शासनाच्या क्रीडा विभागाने पुढाकार घेतला आहे.अशा वेळी शाळा महाविद्यालयाने आपल्या विद्यार्थ्यांना खेळासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे खेळ हे ही एक करियर ची संधी आहे. हे विध्यार्थ्यांमध्ये रुजविले पाहिजे. शिवछत्रपती पुरस्कार म्हणजे खेळाडूंच्या मेहनतीला राजमान्यता असे सांगून आपल्या मनोगतात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शिवछत्रपतींच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार सर्वच पुरस्कार्थींचा अभिमान वाढवणारा आहे.पदकांची भरारी आपण सुरू केली आहे. राष्ट्रीय खेळाडूंची आंतरराष्ट्रीय पातळीवरील कामगिरी उंचवावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.चांगल्या खेळाडूंना प्रशिक्षणासाठी आपण परदेशी पाठवतो पण आता त्यांच्यासोबत त्यांचे प्रशिक्षक, फिजिओ यांनाही परदेशी जाता येणार आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धा करण्यासाठी हे गरजेचे आहे. खेळाडूंच्या सन्मानासाठी पारितोषिक रक्कम वाढवणे व थेट नियुक्त आपण देत आहोत. खेळासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. तालुक्यापर्यंत चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न करत आहोत. महाराष्ट्राच्या खेळाडूंची सर्वोत्तम कामगिरी होत आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, दरवर्षीचा पुरस्कार सोहळा त्याच वर्षी झाला पाहिजे अशी माझी क्रीडामंत्री, अधिकार्यांना विनंती आहे. आगामी पुरवणी मागण्यांमध्ये क्रीडा विभागाला वाढीव रक्कम मंजूर करून त्यांची मागणी पूर्ण केली जाईल. सर्व पुरस्कारार्थींचे मनापासून अभिनंदन करतो. तुम्ही खेळाडू घडवण्याचे काम करा आम्ही तुमच्या पाठीशी उभे राहू. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी करणार्या खेळाडूंचे कौतुक करून नवोदित खेळाडूंना प्रेरणा देणे हा या क्रीडा पुरस्कार सोहळ्याचा मुख्य उद्देश असे सांगून राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, पुरस्कारार्थींच्या नावापुढे छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव जोडले जाणार आहे. त्यामुळे सर्व पुरस्कारार्थींना आयुष्यभर त्याचा अभिमान वाटेल. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर भरीव कामगिरी करणार्या खेळाडूंना चांगली पारितोषिक रक्कम आणि थेट नियुक्ती देत क्रीडा क्षेत्रासाठी पोषक वातावरण तयार करण्याचा प्रयत्न आहे.

कार्यक्रमाचे प्रास्तविक क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले तर आभार प्रदर्शन अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी केले.

## वार्षिक राशिफल वृषभ राशी २०२५

**वृषभ रास -** वृषभ रास - ऋषभ रास ही राशीचक्रातील दुसरी रास आहे. या राशीचे स्वामित्व शुक्र हा ग्रह करतो. २९ मार्च २०२५ रोजी शनी महाराजांनी मीन राशि प्रवेश केला आहे. त्यानुसार वृषभ राशीचे वार्षिक फळ असे सांगते की, वृषभ राशीच्या लोकांना या यावर्षी त्यांच्या नोकरीमध्ये काही प्रमाणात लाभ होताना दिसतील. नोकरीमध्ये बढती किंवा कामांमध्ये ही वाढ होईल. कामाचा व्याप वाढेल. तसेच आर्थिक दृष्ट्या ही वृषभ राशीला यावर्षी चांगला काळ आहे.

मे महिन्यापर्यंत वृषभ राशीच्या लोकांना त्यांच्या मेहनतीनुसार आर्थिक लाभ होतील. त्यानंतर गुरु हा ग्रह मिथुन राशीत प्रवेश करताच अचानक धनलाभ देखील होतील. त्यामुळे तुम्ही लॉन्ग टर्म इन्वेस्टमेंट मध्ये अथवा म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करू शकाल. ते उत्तम राहील. शैक्षणिक दृष्ट्या पहायचे झाले तर शनी, गुरु व राहू बदलामुळे या शिक्षण क्षेत्रामध्ये खूप फायदे होतील. विद्यार्थ्यांना अभ्यासात खूप लक्ष द्यावे लागले तरीही यशाचा मार्ग मात्र मोकळा असेल. सरकारी नोकरीसाठी प्रयत्न करत असाल तर नक्की करा. सरकारी नोकरी लागण्याचे योग देखील आहेत. तसेच व्यापारी वर्गालाही हे वर्ष खूप छान जाणार आहे. मेहनत मात्र खूप करावी लागेल पण त्याच पटीने त्याचे फळ देखील वृषभ राशीच्या व्यापाऱ्यांना मिळेल. व्यापारामध्ये सुरुवातीला गती थोडीशी संथअसेल पण त्यानंतर मात्र चांगलीच




सुधारणा होईल. या वर्षाच्या मध्यानात व्यापारामध्ये खूप मेहनत नाही घेतली तरीही नफ्यामध्ये खूप वाढ होईल. वैवाहिक जीवनात किंवा लवशिपमध्ये केतू ग्रहामुळे काही समज -गैरसमज होऊ शकतात. पण तरीही गुरूमुळे वैवाहिक जीवनात आनंदाचेच वातावरण असेल. नवविवाहित असाल तर अपत्य प्राप्तीचे योग देखील आहेत. व अविवाहित असाल तर विवाह ठरण्याचे योग येतील. वृषभ ही शुक्र प्रधान रास असल्याने शुक्राचेही चांगले संक्रमण होत असल्याने हे वर्ष तुम्हाला अतिशय उत्तम जाईल. आपसामध्ये काही गैरसमज निर्माण झाले असले तरीही ते आपोआप दूर होतील. आर्थिक संकटे ही दूर होतील. पूर्वी केलेल्या गुंतवणुकीतून आता फायदा होईल. यावर्षी तुम्ही घर, जमीन, वाहन अशासारख्या गोष्टींमध्ये गुंतवणूक करू शकता, पण त्यासाठी डोळे उघडे ठेवून व्यवहार करावे लागतील. उलट पक्षी सोने व चांदीतली गुंतवणूक अधिक फायदेशीर ठरेल. गुरु ग्रहाच्या शुभ प्रभावामुळे तुमच्या जीवनातील आव्हाने कमी होण्यास मदत होईल व तुमच्या कुटुंबीयांची तुम्हाला साथ मिळेल. पण आरोग्याच्या बाबतीत सांगायचे झाले तर, हृदयाच्या बाबतीत काही तक्रारी वाढतील. कोलेस्ट्रॉल, पाठीचा मणका यांचेही त्रास संभवतात. एप्रिल तथा मे महिन्यामध्ये तुमचे आरोग्य ठीकठाक असेल पण ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यामध्ये आरोग्याच्या तक्रारी वाढतील. त्यासाठी आजपासूनच रोज नित्यनेमाने व्यायाम करावा. तुम्हाला नवीन व्यवसाय सुरू करावयाचा असेल किंवा पार्टनरशिप करायची असेल तरीही काळ अतिशय उत्तम आहे. वृषभ राशीला साडेसाती लागायला अजून वेळ आहे आणि तरीही मेहनतीचे फळ थोडे कमीच मिळते असे तुम्हाला जाणवेल, पण कष्ट तुम्हाला चुकणार नाहीत. यावर्षी तुम्ही कोणालाही जामीन राहू नका. नाहीतर चक्क लोकांची कर्जे तुम्हाला फेडत बसावी लागतील. घरामध्ये नवीन फर्निचर खरेदी होईल. यावर्षी नाटक सिनेमा यामध्येही मन रमेल. कोर्ट कचेरीचे मात्र काही व्यवहार असतील तर त्यामध्ये मात्र हार पत्करावी लागेल. तुमच्या मनाविरुद्ध निर्णय लागतील. पण एकूणच बघितले तर २०२५ हे वर्ष तुमच्यासाठी अतिशय उत्तम आहे.

**उपाय -** शुक्रवारी देवीच्या देवळात कमळाचे फुल व पिवळ्या रंगाच्या वस्तू अर्पण करणे. लक्ष्मीनारायण मंत्र अथवा विष्णुसहस्त्रनामाचा जप करणे.

**- देवयानी कुलकर्णी.**
**खारघर (रायगड)**

## सुरुलमध्ये मलोबा देवाची यात्रा मोठ्या उत्साहात...

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१८, पाटण :** मलोबाच्या नावानं चांगभलं येडोबाच्या नावानं चांगभलं विठ्ठलाईदेवीच्या नावानं चांगभलं च्या गजरात व पारंपारिक वाद्यांमध्ये गुलाल खोबरं उधळत फटाक्यांची आतष बाजी करत श्री मलोबा देवाची यात्रा मोठ्या उत्साहात पार पडली. मलोबादेवाची काठी वाजत गाजत भक्तगण नाचत होते. सुरूल ता.पाटण येथील श्री मलोबा देवाची काठी प्रति येडोबा मंदिर सुरु ल गावाच्या दक्षिणेस आहे.

त्या ठिक्याण्या पासून वाजत गाजत सायंकाळी ५ वाजता छबिनाला प्रारंभ झाला. येडोबा मंदिराच्या पूर्वेला काठी च्या मार्गावरून मोठ्या उत्साहात नागरिकांनी गावात प्रवेश केला. त्यावेळी छबिण्यावर गुलाल खोबरं उधळत




फटाक्यांची आतिष बाजी मोठ्या प्रमाणात नागरिक करत होते. ठीकठिकाणी श्री मलोबा देवाच्या पालखीला व काठीला महिला ओवाळताना दिसत होत्या व श्री मलोबा देवाला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवताना महिला वर्गाची मोठी मंदिरात गर्दी झाली होती. तर मलोबा देवाचा रात्री ९ वाजता जागरण गोंधळाला सुरुवात झाली पाहाटे श्री मलोबा देवाची पुजा आर्चा करून देवाची विधीवत पूजा करण्यात आली. तर यात्रेमध्ये मेवा मिठाईची मोठ्या प्रमाणात दुकाने आली होती.

लहान मुलांना खेळण्यासाठी विविध खेळणी आल्याने लहान मुले खेळण्याचा आनंद मोठ्या प्रमाणात घेत होती. सायंकाळी चार वाजता जंगी खुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी अनेक पैलवानाणी कुस्ती निकाली करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली यामध्ये सुरूल गावातील नागरिकांनी नवसाच्या कुस्त्या मोठ्या प्रमाणात लावून आपल्या पूर्वजनांचे नाव स्मरणात ठेवले तर लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सुरूल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने वार्षिक पारितोषिक व स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

# छ.शिवाजी महाराज यांच्या नावामुळे संपूर्ण जगात कोयना धरणाची भव्यता वाढेल - पाटणकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१९, पाटण (सातारा) :** कोयना धरणाच्या जलाशयाचे छत्रपती शिवाजी महाराज जलाशय अशा होणाऱ्या नामकरणामुळे देशातच नाही तर संपूर्ण जगात कोयना धरणाची भव्यता वाढेल. छत्रपतींचे हे स्मारक चिरंत कालीन राहील याचा फायदा व लाभ कोयना नगर सह परिसराला चांगल्या पध्दतीने होईल असा विश्वास भाजपा पाटण विधानसभा मतदारसंघ प्रचार प्रमुख विक्रमबाबा पाटणकर यांनी पाटण येथे आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केला यावेळी भाजपाचे पाटण तालुका अध्यक्ष नंदकुमार सुर्वे, चंद्रकांत भिसे यांची उपस्थिती होती.

विक्रमबाबा पाटणकर पुढे म्हणाले, खर वास्तविक पाटण तालुक्यातील तमाम जनतेसह महाराष्ट्रातील, देशातील जनतेची मागणी होती. कोयना धरण शिवाजी सागर या एकेरी नावाचे छत्रपती शिवाजी महाराज जलाशय असे नाम करण होण्याची. जनतेच्या या मागणीचा पाठपुरावा भाजपा पाटण तालुका अध्यक्ष नंदकुमार सुर्वे यांनी केला आहे. या नामकरणाचे चांगले काम याआधी होणे अपेक्षित होते. पण तसे झाले नाही याची खंत व्यक्त करताना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तात्काळ घेतलेल्या या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत होत असल्याची जनभावना आहे.



विक्रमबाबा पुढे म्हणाले, या नाम करणासाठी जिल्ह्यातील सर्व आमदार, खासदार यांच्याकडे वेळोवेळी मागणी करुन त्या अनुषंगाने छत्रपती उदयनराजे भोसले, सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची चर्चा झाली. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आ. मनोज घोरपडे, या सगळ्यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या बरोबर मंत्रालयात बैठक लावली. या बैठकीत जलसंपदा मंत्र्यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने या विषयाकडे पाहिले. आणि तातडीने या संदर्भात सचिवांना आदेश दिले. कायदेशीर पध्दतीने या नाम करणाला भविष्यात याबाबतीत कोणतीही चूक राहता कामा नये. या सर्व बाबींचा अभ्यास करून तशा पद्धतीने शासन निर्णय काढून कोयना धरणाचे छत्रपती शिवाजी महाराज जलाशय असे नाम करण होणार आहे. या बैठकीत केवळ नामकरणाच्या बाबतीत चर्चा झाली असे नाही तर कोयना धरणाच्या जलाशयात छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य दिव्य अश्वारूढ पुतळा ऊभा करण्याच्या बाबतीत देखील सकारात्मक चर्चा झाली. तशा पद्धतीचा आराखडा आठ दिवसात तयार करण्याच्या सूचना मुख्य सचिवांना दिल्या आहेत. तसेच कोयना नगर च्या पर्यटन संदर्भात ज्या काही गोष्टी करता येतील त्या संदर्भात देखील आराखडा तयार करण्याच्या सुचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

कोयना नगरमध्ये गेल्या काही दिवसांपासून पर्यटन आणि बाजार पेठ यांची झालेली दुर्दशा त्यावर झालेला परिणाम याचा विचार करुन कोयनेला मुळपदावर आणण्यासाठी व कोयनेची बाजारपेठ वाढवण्यासाठी भारतीय जनता पक्ष पूर्ण पणाने सक्षम राहिल अशा पध्दतीचे आश्वासन देखील यावेळी ना.पाटील यांनी दिले असल्याचे विक्रमबाबा पाटणकर यांनी शेवटी सांगितले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतर विभागीय क्रिकेट स्पर्धेत कोळसा हाताळणी विभाग विजेता

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१९, नागपूर :** विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ व रमाई महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर विभागीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा खापरखेडा येथे नुकत्याच पार पडल्या. स्पर्धेत खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या अधिनस्त कोळसा हाताळणी विभागाला विजेतेपद तसेच संचलन व संधारण ५०० मेगावाट विभागाला उपविजेतेपद प्राप्त झाले.

प्रथम फलंदाजी करीत संचलन व संधारण ५०० मेगावाट विभागाने १० षटकात ५३ धावा केल्या ज्यामध्ये प्रशांत निखाडेने १२ चेंडूत १२ धावा महत्वपूर्ण राहिल्यात. धावांचा पाठलाग करणे कोळसा हाताळणी विभागास सहज शक्य झाले ज्यामध्ये सलामी फलंदाज संदीप येवले यांनी २७ धावा, तर अविनाश अल्लडवार यांच्या २२ धावा महत्वपूर्ण ठरल्या व कोळसा हाताळणी विभागाने ७ गडी राखून संचलन व संधारण ५०० मेगावाट संघाचा दारुण पराभव केला. कोळसा हाताळणी विभागाच्या संघातील गोलंदाज विजय ढोके याने गोलंदाजी मध्ये आपली भरीव कामगिरी करीत ३ षटकात अवघ्या १२ धावा देत प्रतिस्पर्धी संघाच्या ४ प्रमुख खेळाडूंना बाद केले. त्याचा याचं उत्कृष्ट प्रदर्शनासाठी त्याला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. संपूर्ण स्पर्धेमध्ये उत्कृष्ट फलंदाजी ५ डावात २०५ धावा व चपळ क्षेत्ररक्षणा साठी संदीप येवले यांना मालिकावीर म्हणून सम्मानित करण्यात आले. स्पर्धेमध्ये उत्कृष्ट पंच म्हणून विनय करमकर व अरविंद पाटील, सर्वात उद्योन्मुख खेळाडू म्हणून आक्रमक खिलेश गायधने, उत्कृष्ट सहकार्यासाठी निलेश चिखले यांना गौरविण्यात आले तसेच ओमप्रकाश कापसे यांच्या क्रिकेट बद्दल असलेल्या समर्पण व सहकार्य करिता स्मुर्ती चिन्ह देऊन गौरविण्यात आले.



**(महिलांच्या स्पर्धेमध्ये प्रेरणा महिला मंडळ, खापरखेडा विजयी) :**

महिलाच्या स्पर्धेत अंतिम सामना हा प्रेरणा महिला मंडळ, खापरखेडा व द लायटिंग ११ यांच्यामध्ये खेळला गेला. ज्यामध्ये १० गडी राखत प्रेरणा महिला मंडळ, खापरखेडा ने द लायटिंग ११ संघाचा पराभव केला. प्रथम फलंदाजी करित द लायटिंग ११ संघाने ८ षटकात ७२ धावा केल्यात ज्यामध्ये प्रमुख योगदान श्रद्धा सातपुते ३७ धावा, विशाखा दांडगे १३ धावा तसेच प्रिया आत्राम यांच्या नाबाद ११ धावा महत्वपूर्ण ठरल्यात. प्रेरणा महिला मंडळाच्या नेहा जाधव यांनी २ षटकात फक्त ४ धावा देत २ महत्वपूर्ण गडी बाद केले. प्रेरणा महिला मंडळाची सलामी जोडीने माफक लक्ष अवघ्या ३.३ षटकात पूर्ण केले, पुजा जाधव यांनी सातत्य राखत पुन्हा नाबाद अर्धशतकी खेळी करीत संघाला एकतर्फी विजय मिळवून दिला. पुजा जाधव यांनी संघांसाठी ५६ तसेच मीनाक्षी माने यांनी ९ धावांचे योगदान दिले. पुजा जाधव यांचा आक्रमक फलंदाजी करिता त्यांना अंतिम सामन्याचा सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

**(१७ वर्षा खालील मुलांचे क्रिकेट सामने कॉलोनी रॉक्स संघ विजयी) :**

१७ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट सामन्यात अंतिम सामना हा कॉलोनी रॉक्स व कॉलोनी चॅम्प्स या संघात झाला. प्रथम फलंदाजी करीत कॉलोनी चॅम्प्स संघाने निर्धारीत षटकात ५३ धावा केल्यात ज्यामध्ये प्रतिक चव्हाण चा १८ धावा व संचित गुंडरुकवार याच्या नाबाद १२ धावा महत्वपूर्ण होत्या. कॉलोनी रॉक्स चा फिरकीपटू आदित्य पांडव याने २ षटकात केवळ ६ धावा देत २ गडी बाद केले त्याचा याच प्रदर्शनासाठी आदित्य ला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

बक्षीस समारंभासाठी खापरखेडा विज केंद्राचे उपमुख्य अभियंतागण सुदीप राणे, विराज चौधरी, नारायण राठोड, अधीक्षक अभियंता विलास उके, प्रवीण रोकडे, सुरक्षा विभागाचे सचिन पवार व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. संपूर्ण क्रिकेट स्पर्धेच्या ट्रॉफीस, वार्ड क्रमांक ६ मधील ग्राम पंचायत सदस्य आर.जी.मेश्राम व नरेंद्र पुन यांच्या सौजन्याने देण्यात आल्यात.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ तर्फ स्पर्धा यशस्वी होण्यासाठी कार्याध्यक्ष विजय वाकोडे, सचिव मोरेश्वर लाडे, कोषाध्यक्ष मंगेश शेगोकर, पवन सोमकुवर, मिलिंद रंगारी, यशवंत झोडापे, मयूर वासनिक तसेच रमाई महिला मंडळाच्या पुजा रंगारी, शितल चहारे, स्वीटी वाहाणे, माधवी शेगोकर यांनी सर्वोत्परी प्रयत्न केलेत... स्पर्धेमध्ये ओमप्रकाश कापसे, कुणाल मराठे, प्रणव दाभाडकर, सचिन पवार, विशाल जायस्वाल, मुकेश पराते, गजानन कसूरकर, राजेश बिस्वास, लोकेश चिकणकर, ऋषिकेश भोयर यांचे म ोलाचे सहकार्य लाभले सोबतच निलेश चिखले, प्रशांत हाते, कमलेश भास्कर, प्रशांत निखाडे, राहुल चचाने, अरविंद पाटील, विनय करमकर व विशाल वांढरे यांचा सुद्धा मोलाचा वाटा राहिला.

# अग्निशमन सेवा सप्ताह अंतर्गत नवीन पनवेल ते खारघर भव्य वाहन रॅलीद्वारे जनजागृती



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१९, पनवेल :** अग्निशमन सेवा सप्ताह २०२५ निमित्त नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने पनवेल महानगरपालिका अग्निशमन दल व सिडको अग्निशमन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी नवीन पनवेल ते खारघर अशी भव्य अग्निशमन वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या रॅलीची सकाळी १० वाजता नवीन पनवेल अग्निशमन केंद्र येथून सुरूवात करण्यात आली. पनवेल महापालिकेच्या वतीने मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, अग्निशमन अधिकारी हरिदास सुर्यवंशी, उप अग्निशमन अधिकारी संदीप पाटील तसेच महापालिकेतील महिला व पुरुष अग्निशमन कर्मचाऱ्यांनी या रॅलीचे प्रतिनिधित्व केले. नवीन पनवेल अग्निशमन केंद्र येथून सुरुवात झालेली ही रॅली खांदा कॉलनीमधील ब्रिजमार्गे कामोठे, कामोठे ते महामार्गावरून मंकी पॉइंट खारघर, मंकी पॉइंट ते शिल्प चौक, शिल्प चौक ते रामशेठ ठाकूर शाळा, ग्रामविकास भवन या मार्गाने येत खारघर अग्निशमन केंद्र येथे रॅलीची सांगता झाली. या रॅलीमध्ये महापालिकेच्या अग्निशमन विभागातील १० बुलेट दुचाकी, ४ जीप, २ स्विफ्ट डिझायर कार, १२ अग्निशमन वाहने सहभागी झाली होती. या रॅली दरम्यान अग्निशमन दल हे सजगतेचे व तत्परतेचेप्रतीक ठरणार आहे. नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे आणि अग्निसुरक्षेबाबत सजग व्हावे, असे आवाहन करण्यात आले. या रॅलीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी एकत्र येऊ, अग्निसुरक्षित भारत घडवू असा संदेश देण्यात आला. अग्निशमन सेवा सप्ताह दरवर्षी १४ ते २० एप्रिल दरम्यान साजरा केला जातो. १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबईतील व्हिक्टोरिया डॉक येथे झालेल्या दुर्घटनेत ७१ शूर अग्निशमन कर्मचाऱ्यांनी प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या स्मरणार्थ आणि समाजात अग्निसुरक्षेबाबत जागरूकता वाढवण्यासाठी हा सप्ताह साजरा केला जातो. महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्यावतीने या सप्ताहादरम्यान विविध प्रात्यक्षिके, कळंबोली डिमार्ट येथे मॉक ड्रिल्स, प्रशिक्षण कार्यक्रम आणि जनजागृती उपक्रम घेण्यात आले. जेणेकरून नागरिक, कर्मचारी, उद्योग आणि संस्था अग्निसुरक्षा बाबत अधिक सजग होतील.

# जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे उद्या आयोजन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, नांदेड :** जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन सोमवार, दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली महसुल प्रबोधनी (प्रशिक्षण केंद्र) एसबीआय एटीएम च्या मागे जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे आयोजित केला आहे.

शासन निर्णय ४ मार्च २०१३ नुसार राज्यात सर्व जिल्हयात दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात येतो. जर या दिवशी सार्वजनिक शासकीय सुट्टी असल्यास त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस, महिला लोकशाही दिन म्हणून पाळण्यात येईल असे आदेशित केले आहे. संबंधित समितीचे सदस्य व शासन निर्णयात नमुद संबंधित विभागाचे अधिकारी यांनी उपस्थीत रहावे. तसेच समस्याग्रस्त व पिडीत महिलांनी महिला लोकशाही दिनी आपले अर्ज विहीत नमुन्यात सादर करावेत. असे आवाहन महिला लोकशाही दिन समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी नांदेड यांनी व सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# थोडक्यात

## जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स तर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन



**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.१९, खडकवासला (पुणे) :** आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना वाचायला हवे, त्यांच्यावर मनन, चिंतन, लेखन आणि संशोधन करायला हवे. डॉ. आंबेडकरांचे खरे स्मरण म्हणजे त्यांच्या तत्त्वज्ञानाला आत्मसात करणे, त्यांच्या विचारांचा खोल अभ्यास करणे, असे मत प्रा.डॉ. दत्तात्रय गायकवाड यांनी व्यक्त केले.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स तर्फे ५ वी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. गायकवाड बोलत होते. व्याख्यानमालेचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ऍड. शार्दूल जाधवर यांनी केले आहे. प्रा.डॉ.दत्तात्रय गायकवाड म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान हे केवळ घोषणांच्या देण्यापुरते नको, तर कृतीतून प्रकट झाले पाहिजे. बाबासाहेबांची जयंती म्हणजे बाबासाहेबांचा फोटो डोक्यावर घेऊन नाचण्याचा दिवस नाही. ते पुढे म्हणाले, जर आपल्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ खऱ्या अर्थाने गतिमान करायची असेल, तर आत्मगौरवाचे मुखवटे उतरवून, अहंकारातून बाहेर पडणे गरजेचे आहे. ही चळवळ केवळ आपल्यापुरती न ठेवता, समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचायला हवी असे त्यांनी सांगितले.

## भारतरत्न डॉ.आंबेडकर जयंती कार्यक्रमाचा समारोप



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१८, नागपूर :** क्रांतिवीर श्यामलालबाबू शीवास स्मृती बहुद्देशीय संस्थाच्या वतीने ११ एप्रिल २०२५ पासून महात्मा फुले यांची जयंती साजरी करण्या पासून ते इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर, शासकीय वैद्यकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर, आशा हॉस्पिटल, कामठी नागपूर, यांच्याद्वारे मोफत आरोग्य तपासणी व औषधं वितरण शिबीर घेण्यात आले. त्यात २९५ लोकांचे आरोग्य तपासणी शिबीर घेऊन ५६ लोकांना चष्मे वितरित करण्यात आले व १६ लोकांचे मोतीया बिंदू शास्त्रक्रिया करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचा समारोप सप्तखंजिरी वादक आकाश टाले यांच्या विनोदी समाज प्रबोधनाने मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी परिसरातील मुलांच्या सुप्त गुणांना वाव देण्याकरिता लिंबू चमचा स्पर्धा, संगीत खुर्ची स्पर्धा, रस्सी खेच स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाचे उदघाट्न महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभहस्ते करण्यात वाले. संस्थेच्या स्तुत्य उपक्रमातून महादुला-कोराडी परिसरातील समाजामध्ये उल्लेखनीय कामगिरी करिता ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभहस्ते हुकूमचंद जनबंधू, पन्नालाल रंगारी, पंकज ढोणे, लुकेश वऱ्होकर, इशांत मानवटकर, हर्षद खंडारे यांना शाल, श्रीफळ देऊन;सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे उपमुख्य अभियंता विराज चौधरी, महादुला नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष राजेश रंगारी, प्राचार्य डॉ. हिरालाल मेश्राम, महेश धुडस, रामबाबू तोडवाल, प्रितम लोहासारवा, मनोज सावजी, पवन पखीड्डे, विजय जैन, राहूल बागडे, अजय शाहू, आकाशजी उके, सुनील खोब्रागडे, ब्रिजलाल खोब्रागडे संस्था पदाधिकारी राजेश मछले, बाबुलाल मोटघरे, मुन्नाजी मेश्राम, घनश्याम मेश्राम, पुरण आगासे, नमिता गोडबोले, हुकूमचंद जनबंधू प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विश्वनाथ चव्हाण, महेश बोन्डे, अजय सोलंकी, बापूराव सोनवणे, राहूल इंगोले, स्नेहल मेश्राम, निलेश वानखेडे, प्रितेश वानखेडे, राजेश बोरकर, प्रफ ुल नारनवरे, राकेश करसायल, अभिजित इंगोले, निरंजन वालदे, सुमित मेघराज, उमेश बावनकर, योगेश मेश्राम, अतुल इंगोले, कमलेश खोब्रागडे, प्रविण घोडेस्वार, राजकुमार नारनवरे, सचिन लखारे, विक्की खरवडे, अनिकेत वाणी, सोनू बोरकर, मनोज वाकले, महेंद्र नेवारे, सागर मडावी, राज उके, शोभा इंगोले, वर्षा तानोडे, निकिता लोणारे, दुर्गा इंगोले, आम्रपाली बन्सोड, शांता खोब्रागडे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कार्यक्रमाचे संयोजक अमरजीत गोडबोले यांनी मानले.

## नागपूर विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथे पीठासीन अधिकारी नियुक्त

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, चंद्रपूर :** नागपूर विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथील पीठासीन अधिकारी सेवानिवृत्त झाल्याने गेल्या ५ महिन्यांपासून हे पद रिक्त होते. या रिक्त पीठासीन अधिकारी पदी नियुक्त करण्याबाबत आमदार सुधाकर अडबाले अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान उच्च शिक्षण मंत्री, अवर मुख्य सचिव यांची भेट घेऊन मागणी केली होती. त्यानुसार १७ एप्रिल २०२५ रोजी शासनाने आदेश काढून पीठासीन अधिकारी नियुक्त केले. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम - २०१६ कलम ८१ अन्वये राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. या न्यायाधिकरणाच्या कार्यक्षेत्रात विद्यापीठ व संलग्नित खाजगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सेवाविषयक याचिका व अपिल याचिका यांचा निपटारा करण्याची तरतूद विशद करण्यात आली आहे. परंतू राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, संत गाडगे महाराज अमरावती विद्यापीठ अमरावती, व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली कार्यक्षेत्रातील नागपूर स्थित विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथील पीठासीन अधिकारी ३० ऑक्टोबर २०२४ रोजी सेवानिवृत्त झाल्याने गेल्या ५ महिन्यांपासून पद रिक्त होते.या कार्यक्षेत्रातील अनेक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या बडतर्फ, सेवानिवृत्त कर्मचारी, निवृत्तीवेतन, पदोन्नती, वेतननिश्चिती याचिका, अनेक तक्रार निवारण समिती अपिल याचिका व अन्य सेवाविषयक याचिका प्रलंबित असून न्यायाच्या प्रतीक्षेत होते. त्यामुळे तात्काळ पीठासीन अधिकारी नियुक्ती करण्याची मागणी आ. अडबाले यांनी अधिवेशनादरम्यान उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत माटील, अवर मुख्य सचिव बी. वेणूगोपाल रेड्डी यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली होती. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. १७ एप्रिल २०२५ रोजी शासन आदेश काढून नागपूर येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणाच्या पीठासीन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार न्यायमूर्ती बी.यु.देबडवार यांच्याकडे दिला आहे. त्यांच्या नियुक्तीने न्यायाधिकरणातील प्रलंबित प्रकरणे निकाली निघणार आहे.